सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महानगरपालिका सभा क्रमांक - १० /२०१०-२०११

महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ----------
सदस्य सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (अ) (ह) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **शुक्रवार दिनांक १८/०२/२०११ रोजी दुपारी ०३.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

१०/२/११
प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

परिशिष्ठ

मागील म्हणजे विशेष सभा दि.१० ०१ २०११ आणि सर्वसाधारण सभा दि.२० ०१ २०११ च्या सभांचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे
अ) दु:खवठ्याचे ठराव.
ब) अभिनंदनाचे ठराव.

३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महानगरपालिकेच्या सांगली शहरातील खणभाग पंचमुखी मारुती रस्ता हिराबाग कॉर्नर ते मधुसूदन डेअरी या ५० फूटी पूर्व-पश्चिम रस्ता रुंदीकरणाने एकूण १८५ मिळकती बाधीत होत आहेत. पैकी १६४ मिळकती धारकांनी प्रत्यक्षपणे कब्जेपट्टीद्वारे जागा महापालिकेच्या ताब्यात दिलेल्या आहेत. उर्वरित २१ मिळकती पैकी १५ मिळकती धारकांनी वाढीव एफ.एस.आय. अथवा सन २०१०-११ च्या चालू बाजार मुल्य दरानुसार नुकसान भरपाई मिळणेची मागणी केली आहे. त्यानुसार सदर बाधीत मिळकतधारकांना सन २०१०-११ चे बाजारभावानुसार रु..५९५० - प्रति चौ.मी. या दराने नुकसान भरपाई व त्यामधून नियमाप्रमाणे होणारी मुद्रांक शुल्क कपात करुन उर्वरित रक्कम आदा करणेस आणि रस्ता रुंदीकरणामध्ये बाधीत होणारे क्षेत्र खाजगी वाटाघाटीने संपादन करणेस धोरणात्मक मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.०१/०२/२०११ चे विषयपत्र.**

महानगरपालिकेच्या सांगली शहरातील गावभाग मारुती चौक ते शास्त्री चौक या ७० फूटी दक्षिणोत्तर रस्ता रुंदीकरणाने एकूण ६३ मिळकती बाधीत होत आहेत. पैकी काही मिळकती धारकांनी प्रत्यक्षपणे कब्जेपट्टीद्वारे जागा महापालिकेच्या ताब्यात दिलेल्या आहेत. सदरच्या मिळकती उतरवून रस्त्यासाठी भाग मोकळा करणेत आलेला आहे. तथापि, सदर रस्त्यावरील काही माळकतधारकांनी नुकसान भरपाई रोखीच्या स्वरुपात मागणी केली आहे. त्यानुसार सदर बाधीत मिळकतधारकांना सन २०१०-११ चे बाजारभावानुसार रु.७०४० - प्रति चौ.मी. या दराने नुकसान भरपाई व त्यामधून नियमाप्रमाणे होणारी मुद्रांक शुल्क कपात करुन रक्कम अदा करणेस आणि रस्ता रुंदीकरणामध्ये बाधीत होणारे क्षेत्र खाजगी वाटाघाटीने संपादन करणेस धोरणात्मक मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.०१/०२/२०११ चे विषयपत्र.**

६. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या वतीने आणि शासन निर्णयानुसार महापालिका क्षेत्रामध्ये समुपदेशक केंद्र सुरु करणेकामी नॅशनल इन्स्टीट्यूट फॉर कम्युनिटी डेव्हलपमेंट अॅन्ड रिसर्च सांगली या संस्थेच्या वतीने चालविणेस व त्याकामी येणारे वार्षिक रु.रु.४२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (मबाकस) यांचे दि.३०/१२/२०१० चे विषयपत्र.**

शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

८. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

सांगली,मिरज आणि कुपवाड महानगरपालिका

महासभा क्रमांक :- १० दिनांक :- १८/०२/२०११

ठराव क्रमांक :- २३१

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.०१/०२/२०११ चे विषयपत्र आणि दि.१७/०२/२०११ चे सुधारीत विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या सांगली शहराच्या सुधारीत विकास योजनेनुसार खणभाग हिराबाग कॉर्नर ते मधुसूदन डेअरी (पंचमुखी मारुती रस्ता) ५० फूट रुंदीचा प्रस्तावित आहे. सदर रस्ता रुंदीकरणामध्ये एकूण १८५ मिळकती बाधीत होत आहेत. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार सार्वजनिक कारणासाठी मंजूर/प्रारुप विकास योजनेतील आरक्षीत जमिनी व रस्ते खाजगी वाटाघाटीने घेणेची अथवा विना बोजा हस्तांतरीत केलेल्या जमिनीच्या क्षेत्राच्या बदल्यास चटई क्षेत्र निर्देशांक (एफ एस आय) किंवा नुकसान भरपाई रक्कमेच्या स्वरुपात देण्याची तरतुद आहे. महासभा ठराव क्र.३९ दि.१९/०५/२००७ अन्वये मिळकतधारकांच्या मागणी प्रमाणे चटई क्षेत्र व नुकसान भरपाई देण्यात आली आहे.

रस्ता रुंदीकरणामध्ये एकूण १८५ मिळकती बाधीत होत असून, पैकी १६४ मिळकतधारकांनी मिळकती प्रत्यक्षपणे कब्जेपट्टीद्वारे महापालिकेच्या ताब्यात दिल्या आहेत. शिल्लक २१ मिळकत धारकांनी वाढीव एफ एस आय अथवा सन २०१०-११ च्या बाजार मुल्यानुसार रक्कम स्विकारणेची संमत्ती दर्शविली आहे. तथापि, सद्यस्थिती मध्ये रोखीच्या स्वरुपात ज्या मिळकत धारकांनी मागणी केली आहे. सदर बाधीत मिळकत धारकांना सन २०१०-११ चे बाजारमुल्य दरानुसार रु.५९५०/- प्रति चौ.मी.या दराने नुकसान भरपाई रक्कमेतून नियमाप्रमाणे होणारी मुद्रांक शुल्क कपात करुन घेवून उर्वरित रक्कम आदा करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Keerzzon

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

नगररचनाकार

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड महानगरपालिका

महासभा क्रमांक :- १० दिनांक :- १८/०२/२०११

ठराव क्रमांक :- 232

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.०१/०२/२०११ चे विषयपत्र आणि दि.१७/०२/२०११ चे सुधारीत विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या सांगली शहराच्या सुधारीत विकास योजनेनुसार गावभाग मारुती चौक ते शास्त्री चौक दक्षिण उत्तर ५० फुटी रुंदीचा रस्ता प्रस्तावित आहे. सदर रस्ता रुंदीकरणामध्ये एकूण ६३ मिळकती बाधीत होत आहेत. पैकी रस्त्याने बाधीत मिळकती पैकी ज्या प्रत्यक्षात कब्जेपट्टीद्वारे ताब्यात आलेल्या आहेत. तो भाग रस्त्यासाठी खुला करणेत आलेला आहे. तथापि, काही मिळकतधारकांनी सन २०१०-११ चे मुल्य दरानुसार नुकसान भरपाई रोखीच्या स्वरुपात मागणी केली आहे.

विषयांकीत रस्ता रुंदीकरणामध्ये बाधीत होणाऱ्या मिळकत धारकांपैकी सद्यस्थिती मध्ये ज्या मिळकत धारकांनी नुकसान भरपाईची मागणी केली आहे. त्यांना सन २०१०-११ चे बाजार मुल्य दरानुसार रु.५०४०/- प्रति.चौ.मी. याप्रमाणे नुकसान भरपाई रक्कमेतून नियमाप्रमाणे होणारी मुद्रांक शुल्क कपात करुन घेवून उर्वरित रक्कम आदा करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Kelkar

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

नगररचनाकार

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड महानगरपालिका

महासभा क्रमांक :- १० दिनांक :- १८/०२/२०११

ठराव क्रमांक :- २३३

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (म.बा.क.स.) यांचे दि.३०/१२/२०१० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

शासन निर्णयानुसार महापालिका क्षेत्रात जास्तीत जास्त समुपदेशक केंद्र सुरु करावीत असे निदेश आहेत. त्यानुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये महिला व बाल कल्याण समितीच्या वतीने महासभा ठराव क्र.१३९ दि.१९/१२/२००९ अन्वये हनुमान वाचनालय,सांगलीवाडी या संस्थेच्या वतीने समुपदेशक केंद्र सुरु करणेस मान्यता दिली आहे. तथापि,नॅशनल इन्स्टिट्युट फॉर कम्युनिटी डेव्हलपमेंट अँड रिसर्च या संस्थेच्या बाबतीत समक्षात माहिती घेवून फेर मान्यतेसाठी अहवाल सादर करणेबाबत सूचित करणेत आले होते.

महासभेने सूचित केलेनुसार विभाग प्रमुख यांनी सदर संस्थेची माहिती घेतली असून, सदरची संस्था ही सन १९९८ पासून कार्यरत आहे. संस्थेमार्फत सामाजिक कार्य,आरोग्य विषयक सल्ला, मोफत वाचलनालयाची सोय इत्यादी कार्य करीत असून, सदर संस्थेमार्फत समुपदेशक केंद्र चालविण्यास महिलांना सामाजिक कायदेविषयक मोफत सल्ला देणेचे कार्य जबाबदारीने पार पाडू शकेल असे मत स्पष्ट केले आहे. सबब, महापालिका क्षेत्रामध्ये नॅशनल इन्स्टिट्युट फॉर कम्युनिटी डेव्हलपमेंट अँड रिसर्च, सांगली या संस्थेमार्फत समुपदेशक केंद्र सुरु करणेस व त्याकामी येणारे वार्षिक र.रु.४२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी विषयांकीत प्रस्ताव दाखल केला आहे. त्याशी ही सभा सहमती दर्शवित आहे.

महापालिका क्षेत्रामध्ये महिला बाल कल्याण समितीच्या वतीने नॅशनल इन्स्टिट्युट फॉर कम्युनिटी डेव्हलपमेंट अँड रिसर्च, सांगली या संस्थेमाफत समुपदेशक केंद्र सुरु करणेस व त्याकामी येणारे वार्षिक र.रु.४२,०००/- मात्रचे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तस्तुदी मधून होणेचा आहे.

सूचक :- Keerron

अनुमोदक :-

महिला व बालकल्याण समिती

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

ठरावसर्वानुमते मंजुर

महापौर,